# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## मा. इ प्रभाग समिती

## विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१

## सभावृत्तांत

दिनांक – ०९/०५/२०१९ वेळ : दु १२.१०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. इ प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेष सभा **गुरूवार** दिनांक **०९/०५/२०१९** रोजी दु १२.१० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ या ठिकाणी **मा.राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से)** पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे ४११००५ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री काळजे नितीन प्रताप
२) मा.सुवर्णा विकास बुर्डे
३) मा.विनया प्रदीप (आबा)तापकीर
४) मा.श्री लक्ष्मण शेठ सोपान सस्ते
५) मा.श्री.डोळस विकास हरिचंद्र
६) मा. श्री उंडे लक्ष्मण धोंडू
७) मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन
८) मा.गायकवाड निर्मला मनोज
९) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.बारसे प्रियांका प्रविण
१२) मा.श्री.अजित दामोदर गव्हाणे
१३) मा.श्री.संतोष आणणा ज्ञानेश्वर
१४) मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
१५) मा.फुगे भिमाबाई पोपट
१६) मा. श्री नितीन ज्ञानेश्वर लांडगे

याशिवाय मा.श्री. श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, इ क्षेत्रीय कार्यालय, श्री.मोहन निकम - सभा सचिव तथा प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

| | |
|---|---|
| पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा | सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. **इ** प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.<br>**प्रभाग समिती सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.** |
| **प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** | मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणेकामी एकूण २ (दोन) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे |

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.बुर्डे सुवर्णा विकास | मा.गायकवाड निर्मला मनोज | मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे |
| २ | मा.बुर्डे सुवर्णा विकास | मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | मा.विकास हरिश्चंद्र डोळस |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेली एकूण २ (दोन) नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

| | |
|---|---|
| पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा | मा. इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एका उमेदवाराचे २ (दोन) नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये **मा.बुर्डे सुवर्णा विकास** प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.बुर्डे सुवर्णा विकास ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. |

मा.बुर्डे सुवर्णा विकास प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बुर्डे सुवर्णा विकास** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे नियम २००७ मधील कलम ६ (१) नुसार **मा.बुर्डे सुवर्णा विकास** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फ प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
**पिठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त आयुक्त,**
पुणे महानगरपालिका,
पुणे ४११००५

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८**

**मा.इ प्रभाग समिती**

**विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१**

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक –०९/०५/२०१९ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.बुर्डे सुवर्णा विकास** प्रभाग समिती सभापती पदाकरीता **मा.बुर्डे सुवर्णा विकास** या उमेदवाराने एकूण २ (दोन) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल केले असून सदर नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. इ प्रभाग समिती सभापती पदाकरीता **मा.बुर्डे सुवर्णा विकास** ह्या एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे इ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
**पिठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त आयुक्त,**
पुणे महानगरपालिका,
पुणे ४११००५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय,
भोसरी – ३९. प्रशासन विभाग.
क्रमांक : इक्षेका/४/कावि/ /२०१९
दिनांक :०९/०५/२०१९

**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव सभा शाखा
इ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.